पुढारी बुधवार, १० सप्टेंबर २०२५





कोल्हापूर : मनपास्तर नेहरू हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकावत विभागीय स्पर्धेत पात्र ठरलेले विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंका कॉलेजचे संघ.

# विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंकाला विजेतेपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मनपास्तर शासकीय शालेय नेहरू हॉकी स्पर्धेला मंगळवारी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर प्रारंभ झाला. अंतिम फेरीत विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंका संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. तिन्ही संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन सचिन पांडव, मोहन भांडवले, सागर जाधव, महेश सूर्यवंशी, प्रदीप पोवार, समीर भोसले,

## मनपास्तर नेहरू हॉकी स्पर्धा

सिद्धी पाटील, योगेश माने, आर. डी. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाले.

१५ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज संघाने विमला गोयंका इंग्लिश स्कूलचा एकमेव गोलने पराभव केला. मिहीर इंगवलेने विजयी गोल केला. विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज संघात अथर्व आळवेकर, शौर्य टिपुगडे, वेदांत नारायणपुरे, यशवर्धन सुर्वे, मिहीर इंगवले, पुष्कराज मोहिते, पारस पिशले, आयुष लोहार, आद्य मुळीक, अवनीश जाधव, सोहम निकम, रिषभ सासणे, सुयोग बेकनाळकर, वीर पटवणे, वरदराज पाटील, दानीस मणेर यांचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने महावीर इंग्लिश स्कूलचा ३-० गोलने पराभव केला. महावीर इंग्लिश स्कूलच्या प्रसिद्धी कांबळे हिने ३ गोल नोंदवले. विजयी संघात श्रुतिका, श्रेया, ऋत्वी, गायत्री, मधुरा, कार्तिकी, प्रसिद्धी, दिया, केतकी, स्वरूपा, ऋचा, तनिष्का, इरा, अर्पिता, वैष्णवी, ऋतुजा. या मुलींचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेज संघाने सौ. स. म. लोहिया हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज संघाचा ५-० असा पराभव केला. विवेकानंद कॉलेज संघातून मुजमिल बाबाखान याने ३, पीयूष करडे याने २ गोल केले.

विजयी संघात वीर पाटील, हर्षवर्धन सुतार, अंकुश महेंद्रकर, श्रीतेज कोगेकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, शिवराज दिवे, मुजमिल बाबाखान, मयंक नलगे, पीयूष करडे, तनिष्क कुडाळकर, गुरुराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव, आयुष हवळ, पार्थ तोडकर यांचा समावेश होता.

P

दैनिक महासत्ता इचलकरंजी

कोल्हापूर, बुधवार, १० सप्टेंबर २०२५

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत १९ रोजी उद्योजक मेळावा

कोल्हापूर, ता.९ (प्रतिनिधी) –

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर व दे आसरा फाउंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, ता. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

हा कार्यक्रम विनामुल्य असून नोंदणी आवश्यक आहे. ज्यांना व्यवसाय सुरु करायचा आहे आणि ज्यांचा व्यवसाय सुरु आहे अशा इच्छुक उद्योजक, नवउद्योजकांनी https://forms.gle/M1nWMzbT93GYijEm9 या गुगल फॉर्म मध्ये नोंदणी करुन मेळाव्यास उपस्थित रहावे. तसेच अधिक माहितीसाठी ०२३१-२५४५६७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

लोकमत
कोल्हापूर, बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये १९ला उद्योजक मेळावा

कोल्हापूर : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दे आसरा फाउंडेशन व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने १९ ला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे उद्योजक मेळावा होणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून नोंदणी आवश्यक आहे. अनिल वाडीकर मार्गदर्शन करतील. उद्योजक कट्टांतर्गत महेश तोरगळकर यांच्याशी चर्चा होणार आहे. स्वयंरोजगारविषयक कर्ज देणारे महामंडळांचे स्टॉल लावण्यात येतील. इच्छुक उद्योजक, नवउद्योजकांनी https://forms.gle/M1nWMzbT93GYijEm9 यामध्ये नोंदणी करून उपस्थित राहावे, असे आवाहन जमीर करीम यांनी केले आहे.

पुण्य नगरी

बुधवार, १० सप्टेंबर २०२५ | कोल्हापूर

# 'स्वामी विवेकानंद'मध्ये १९ रोजी उद्योजक मेळावा

**कोल्हापूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दे आसरा फाऊंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून, नोंदणी आवश्यक आहे. विविध क्षेत्रांतील सूक्ष्म, लघु व नवउद्योजक एकत्र आणून ज्ञानाची देवाणघेवाण करणे, नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच व्यवसाय वाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे. यावेळी अनिल वाडीकर, उद्योजक महेश तोरगळकर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच स्वयंरोजगारविषयक कर्ज देणाऱ्या सर्व शासकीय महामंडळांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत.

तरुण भारत संवाद
बुधवार, १० सप्टेंबर २०२५

# पद्माराजे, गोयंका, विवेकानंद कॉलेजला अजिंक्यपद





कोल्हापूर : १७ वर्षाखालील मुलींच्या गटात अजिंक्यपद मिळवलेला प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूलचा संघ. २) १७ वर्षाखालील मुलांच्या गटात जेतेपद मिळवलेला विवेकानंद ज्युनिअर कॉलेजचा संघ

## मनपास्तरीय शासकीय शालेय नेहरु चषक हॉकी स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापूर मनपास्तरीय शासकीय शालेय नेहरू चषक हॉकी स्पर्धेत १५ वर्षाखालील मुलांच्या गटात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज, १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने तर १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने अजिंक्यपद पटकावले. कोल्हापूर महानगरपालिका आणि कोल्हापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने या हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियममध्ये ही स्पर्धा झाली.

१५ वर्षाखालील मुलांच्या गटात झालेल्या अंतिम सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजने विमला गोयंका इंग्लिश मिडियम स्कूलचा १-० गोलने पराभव करत जेतेपद पटकावले. विमला गोयंका कॉलेजला जेतेपद मिळवून देण्यासाठी मिहिर इंगवलेने केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने महावीर इंग्लिश मीडियम स्कूलला ३-० गोलने पराभूत करत विजेतेपद पटकावले. पद्माराजे गर्ल्स हायस्कूलला विजेतेपदाचा सरताज मिळवून देण्यासाठी प्रसिद्धी कांबळे हिने गोलची हॅटट्रीक नोंदवली.

स्पर्धेतील १५ वर्षाखालील मुलांच्या गटात झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजने दत्ताबाळ हायस्कूलवर १-० गोलने विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने न्यू हायस्कूलचा टायब्रेकरमध्ये ३-२ गोलफरकाने पराभव करत अंतिम फेरी गाठली. सामना पूर्ण वेळेत गोलशुन्यबरोबरीत सुटला होता. त्यामुळे सामना विजयाचा फैसला करण्यासाठी टायब्रेकरचा अवलंब केला होता.

१७ वर्षाखालील मुलांच्या झालेल्या सामन्यात विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने न्यू हायस्कूलला २-० गोलने पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. विवेकानंद कॉलेजला सामन्यात विजयी करण्यासाठी शिवराज दिवे याने पहिला तय पियूष करडे याने दुसरा गोल नोंदवला. विवेकानंद ज्युनिअर कॉलेज आणि स. म. लोहिया हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज यांच्यात अंतिम सामना झाला. यात विवेकानंद कॉलेजने ३-० गोलने विजय मिळवत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. विवेकानंद कॉलेजला अजिंक्यपदी विराजमान करण्यासाठी मुजमिल बाबाखानने २ तर पियूष करडेने १ गोल केला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कोल्हापूर जिल्हा हॉकी असोसिएशनचे अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, हॉकी प्रशिक्षक मोहन भांडवले, माजी राष्ट्रीय हॉकीपटू नजीर मुल्ला, प्रशिक्षक सागर जाधव, महेश सूर्यवंशी, प्रदीप पोवार, आर. डी. कुलकर्णी, समीर भोसले, सिद्धी पाटील, योगेश माने यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धा विजेता विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजचा संघ**

अर्जुन आळवेकर, सुयोग बेकनाळकर, शौर्य टिपुगडे, वेदांत नारायणपुरे, वीर पटवणे, वरदराज पाटील, रिषभ सासने, यशवर्धन सुर्वे, मिहीर इंगवले, पुष्कराज मोहिते, पारस पिराळे, दानिश मणेर, आयुष लोहार, आदय मुळीक, अवनीश जाधव, सोहम निकम.

**स्पर्धा विजेता प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूलचा संघ :**

प्रसिद्धी कांबळे, श्रेया खराडे, श्रुतिका पाटील, वैष्णव लिंगडे, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, ऋत्वी सांगळे, ऋतुजा कुंभार, ऋचा पंकज सांगळे, इरा जाधव, अर्पिता लोंढे, मधुरा भोसले, स्वरुपा पोवार.

**स्पर्धा विजेता विवेकानंद ज्युनिअर कॉलेज :**

अंकुश महेंद्रकर, शिवराज दिवे, श्रीतेज कोगेकर, हर्षवर्धन सुतार, सार्थक राणे, वीर पाटील, मुजमिलखान बाबाखान, मयंक नलगे, पियूष करडे, तनिष्क कुडाळकर, गुरुराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव, आयुष हावळ, पार्थ तोडकर.